# वास्तुशास्त्र --- काही शंका

-- **म. ना. गोगटे** www.mngogate.com मधील लेख M07 लेखकसंपर्क वेबसाईट इंडेक्सपानावर

मी स्ट्रक्चरल इंजीनियर व आर्किटेक्ट हा व्यवसाय कित्येक वर्षे केला. साधारणपणे 1990 नंतर वास्तुशास्त्र नावाची लाट समाजात पसरू लागली. तिचा आधार म्हणजे काही प्राचीन संस्कृत ग्रंथ. मराठीतून व इंग्रजीतून माहिती देणारे वास्तुशास्त्री उदयाला आले, त्यांचा सल्ला कित्येकजण मानू लागले. वास्तुशास्त्रास शुभ-अशुभ दिशा, शुभ-अशुभ रचना वगैरे निश्चित अर्थ प्राप्त झाला.

प्राचीन भारतात आयुर्वेद आणि गणितशास्त्रानी काही प्रगती केली असल्याने प्राचीन ग्रंथांतील सर्व विधाने सत्य असणारच असे समजू नये. उदा एका धर्मग्रंथात म्हटले आहे की तामसी लोक शिळे अन्न खातात. हे विधान पटत नाही. हिटलरसारखे तामसी लोक ताजे अन्न खात होते. फ्रीजमध्ये अन्न टिकते तरीपण ते शिळेच अन्न असते. बाबावाक्यम् प्रमाणम् असे मानल्यास प्रगती होणार नाही. प्राचीन तत्वज्ञ ॲरिस्टॉटल याचे विधान होते की समान उंचीवरून टाकल्यास जड वस्तु हलक्या वस्तुअगोदर भूमीस पोचते. काही शतके त्यावर सर्वांचा विश्वास होता. प्रत्यक्ष प्रयोग करून गॅलिलियोने हे विधान खोटे आहे असे दाखवले. गुरु ग्रहास काही चंद्र आहेत असेही त्याने दुर्बीण वापरून दाखवले. बुद्धी व प्रयोग यांमुळे युरोपची वैज्ञानिक प्रगती झाली. प्राचीन काळात मुद्रणकला नव्हती, झेरॉक्स नव्हते. पोथ्याच्या कॉपी हाताने लिहिताना चुका होणे शक्य आहे. म्हणून बुद्धीची कसोटी लावलीच पाहिजे.

तरीही माझ्या मनात आले की वास्तुशास्त्री काय म्हणतात ते जरा वाचून पहावे. मला दिसले की सर्व लेखकांत एकवाक्यता नाही. एक अन्य संशोधक म्हणाले की "शुभ-अशुभ, तोडफोड विचार मूळ संस्कृत ग्रंथांत नाहीत. पोटभरू अर्वाचीन लेखकानी या अफवा उठवल्या आहेत. कित्येक प्राचीन वास्तुंमागे सुयोग्य शास्त्र आहे. " मी संस्कृत ग्रंथ वाचले नाहीत. जानेवारी ते जून 2001 मध्ये काही मराठी व इंग्रजी पुस्तके पाहिली. काही शंका माझ्या मनात आल्या. त्या येथे मांडत आहे.

(1) वास्तुशास्त्रीच्या सल्ल्यावरून काही बंगलामालकानी इमारतीत तोडफोडी केल्या, खूप काळा पैसा खर्च केला, तथापि त्यांना लाभ झाला नाही. आता आयकर खात्याची धाड नको, मूर्खपणा जाहीर व्हायला नको असे ते म्हणाले. मालकाचे नाव व इमारतीचा पत्ता जाहीर न केल्यास संशोधन अविश्वसनीय ठरते. वास्तुशास्त्री पुस्तकात उदाहरणांचा ठावठिकाणा देत नाहीत. ते थापा मारत असण्याची शक्यता आहे.

(2) दक्षिणेकडे पाय करून झोपणे अशुभ आहे असे सांगण्यात येते. वास्तुशास्त्री आगगाडीत झोपून प्रवास कसा करतात ? लोहमार्गाच्या वळणानुसार शय्येची दिशा बदलत असते.

(3) प्लॉटचे क्षेत्र व्यापणारा एक वास्तुपुरुष असतो असे सांगण्यात येते. जमीनीचे विभाजन झाले, किंवा काही जागा रस्तारुंदीत गेली तर त्या वास्तुपुरुषाचे काय होते ?

(4) समजा रस्त्याला लागून चार बाजूंचा एक प्लॉट आहे. रस्त्याकडील बाजू विरुद्ध बाजूहून मोठी असली तर तो प्लॉट वाघमुखी, अशुभ असतो, याउलट स्थिती असल्यास प्लॉट गोमुखी, शुभ असतो असे सांगण्यात येते. हे शुभाशुभ तर्काला पटत नाही. प्लॉटच्या सीमा मानवनिर्मित असतात. निसर्गाचे (सूर्य, वारा, पक्षी, आग, गुरुत्वाकर्षण, झाडे, भूकंप इत्यादिंचे) कार्य सीमानिरपेक्ष असते. समजा, सर्व जमीनीचे राष्ट्रीयीकरण व एकत्रीकरण केले तर सीमारेषा पुसल्या जातील, फक्त घरे रहातील. असे असताना सीमारेषा, वाघमुखी आकार यांचा प्रभाव कसा काय असू शकतो ?

(5) इमारतीच्या क्षेत्रफळाला विशिष्ट संख्येने भागून येणारा भागाकार हे इमारतीचे आयुष्य असते असे हास्यास्पद विधान आढळते. टिकाऊपणासाठी बांधकामाच्या दर्जाचा विचार दिला नसतो.

(6)खिडक्या बाहेर उघडणे अशुभ, आत उघडणे शुभ असे विधान आढळते. आत उघडणाऱ्या खिडक्यांमुळे पाऊसपाणी आत येण्याचा संभव असतो, भिंतीवरील खिडकीजवळचे पडदे सरकवण्यास अडचण होते. हल्ली सरकत्या ॲल्युमिनियम खिडक्या असतात हे वास्तुशास्त्रींना माहीत नसावे.

(7) ईशान्येला विहीर शुभ आहे असे सांगण्यात येते. प्राचीन काळात नलिकाविहीरी नव्हत्या, पंप नव्हते मग त्याबाबत पोथीत माहिती कशी असणार ? मोठ्या व्यासाची खोल विहीर इमारतीसमीप केल्यास काही परिस्थितीत इमारतीचे संतुलन बिघडून इमारत कलते हे वास्तुशास्त्रींना माहीत नसावे.

(8)मार्च 2000 मध्ये शेअरबाजार तेजीत होता, मार्च 2001 मध्ये प्रचंड मंदी आली. इमारतीत बदल झाला नसताना हे चढउतार गुंतवणूकदारांनी पाहिले. दिशांची शुभाशुभता निरर्थक आहे

अन्यही शंका घेता येतील. खरे तर बिल्डर, ग्राहक, अभियंता यानी साधे विज्ञान वापरले तरी इमारती सुधारतील. उदा - बाल्कनीतले पाऊसपाणी खोलीत येऊ नये म्हणून बाल्कनीची स्लॅब मुख्य स्लॅबसापेक्ष तीन इंच खाली ठेवावी व फरशीला निचरानळीकडे उतार द्यावा. जिन्याला गजांचा पूर्ण कठडा न लावता खालचा निदान एक फूट भाग घन कट्टा असावा म्हणजे सफाई करताना पाणी व केर भलतीकडे ओघळणार नाहीत. प्राचीन काळात जमीन मुबलक होती व घरे लहान होती. आता उंच इमारती असतात, एकाच मजल्यावर अनेक सदनिका अपरिहार्य असतात. त्या सर्वांना तथाकथित शुभ दिशांना खिडक्या व दारे लाभणार नाहीत. लाखो लोक कष्टपूर्वक कर्ज काढून सदनिका घेतात. त्यांना व्यवहाराची काही चिंता असते. त्यातच वास्तुशास्त्राची अनाठायी भीती घालू नये.

*पूर्वप्रसिद्धी तरुण भारत 1 ऑगस्ट 2001 मराठी विज्ञान परिषद पत्रिका दिवाळी 2001 येथे संक्षेपाने*